Std :- X , Div __ | III & IV Unit Test | Marks :- 20
Date :- 25.08.2018 | Subject :- Marathi | Time :- 45 Min.

कृ 1) :खालील उतारा वाचून त्याखालील कृती सोडवा.

सुश्रुतः तुम्ही सगळे कोण आहात?
कथा : अरे,असा घाबरतोस काय? हे सगळे आपलेच मित्र आहेत. सगळ्यांशी चांगली मैत्री होईल तुझी. माझी ओळख तर तुला लहानपणापासूनच आहे. अरे,मी आहे कथा.गोष्ट हे माझंच दुसरं नाव.
सुश्रुतः आपली ओळख कशी काय?
कथा : आईच्या,आजीच्या तोंडून इसापनीती,पंचतंत्र, अकबर-बिरबल अशा गोष्टी ऐकत ऐकत तुम्हाला मला वाचायची सवय लागते ना!
सुश्रुत : हो आता आठवलं आजी मला नेहमी कोल्हा,उंदीर,ससा-कासव यांच्या गोष्टी सांगायची.
कथा : बरं का सुश्रुत !आकर्षक सुरुवात आणि परिणामकारक शेवट ही माझी वैशिष्टये
सुश्रुत : तुझे काही प्रकार असतात का? कारण आज मराठीच्या मॅडम म्हणाल्या, "आपण 'साहस कथा' शिकूया."
कथा : अगदी बरोबर !परीकथा,बोधकथा, विज्ञानकथा,ऐतिहासिक कथा हे माझेच अनेक उपप्रकार आहेत. शिवाय नाटक,मालिका,चित्रपट यासर्व ललितकलांचा पाया म्हणजे मी.मूळ कथा दर्जेदारअसल्याशिवाय कोणतीही कलाकृती उत्तम होऊ शकत नाही. एवढंच नाही तर उत्तम निवेदन तंत्रामुळे मी खुलत जाते,रंगत जाते किंबहुना उत्तम निवेदनतंत्राचा वापर हे माझ्या यशाचं रहस्य.
सुश्रुत : तुला निर्माण करणा-या लेखकांची नावे सांग ना -
कथा : य.गो.जोशी,वि.स.खांडेकर,विभावरी शिरूरकर,व्यंकटेश माडगूळकर,व.पु.काळे,शंकर पाटील, अण्णा भाऊ साठे,बाबुराव बागुल,द.मा. मिरासदार यांसारख्या अनेक नामवंत लेखकांनी आपल्या उत्तमोत्तम कथांनी मराठी वाचकांना तृप्त केलंय.

Pg 1...

Scanned by CamScanner

कृती-1. आकृती बंध पूर्णकरा. [2]

i. कथेचे प्रकार



ii. उता-यात आलेल्या कोणत्याही चार कथाकारांची नावे [2]



कृती 2 - व्याकरणकृती

1. लिंग बदला. [1]

1. आजी 2. आई

2. विरुद्धार्थी शब्द लिहा. [1]

1. सुरुवात 2. आकर्षक

कृती 3 - स्वमत. [2]

पुस्तकांशी मैत्री करण्याचे फायदे लिहा

प्रश्न 2) खालील पदय-उतारा वाचून कृती सोडवा.

कृती 1 - आकलन कृती.

1. आकृती पूण 'करा. [1]

सैनिक जिददीने पाऊल टाकतो ती परिस्थिती-

-----------------

- ---------------

-----------------

नाही मुठीमध्ये द्रव्य
नाही शिरेमध्ये रक्त,
काय करावे कळेना
नाही कष्टाचे सामर्थ्य;

Pg 2..-

Scanned by CamScanner

जीव ओवाळावा तरी
जीव किती हा लहान;
तुझ्या शौर्यगाथेपुढे
त्याची केवढीशी शान;
वर घोंघावे बंबारा,
पुढे कल्लोळ धुराचे,
धडाडत्या तोफांतून
तुझे पाऊल जिद्दीचे;
तुझी विजयाची दौड
डोळे भरून पहावी;
डोळ्यांतील आसवांची
ज्योत ज्योत पाजळावी
अशा असंख्य ज्योतींची
तुझ्यामागून राखण;
दीनदुबळ्यांचे असें
तुला एकच औक्षण.

2. एका वाक्यात उत्तरे लिहा [2]

i. कष्टाचे सामर्थ्य अपुरे केव्हा वाटते?

3. चौकटी पूर्णकरा. [1]

i. जवानाला यांचे एक औक्षण आहे- ☐

ii. जवानाचे पाऊल असे आहे- ☐

3. व्याकरणकृती- [1]

1. खालील नामांची सामान्यरूपे लिहा.

i. मुंबईहून ii. दिवस

4. खालील वाक्यांतील अधोरेखित शब्दाचा प्रत्यय व विभक्ती ओळखून लिहा. [1]

1. अभिषेकला रेखा मावशींनी <u>घरात</u> घेतले.

पृ ३...

Scanned by CamScanner

5. परिभाषिक शब्द लिहा. [1]

i. Comedy ii. Census

6. खालील वाक्यांतील विरामचिन्हे ओळखा व त्यांची नावे लिहा. [1]

i. "अन्वर जेवला?"

7. लेखनकौशल्य

खालील विषयावर बातमी तयार करा. [4]

विषय-डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या स्मरणार्थ आयोजित शिक्षक दिन कार्यक्रम.

स्थळ-वासुदेव बळवंत फडके विदयालय, सावंतवाडी.

Pg 4.....

Scanned by CamScanner